# युवक दिन विशेष : या युवकाचे किती कौतूक करावे!

## सुरतहून जगन्नाथ पूरी साठी निघाले सायकलने | यापुर्वी सूरत ते अयोध्या, सुरत ते केदारनाथही केले सर






**मनिष जगताप**

**अमरावती,( दि.11 )-** युवक दिनाच्या पुर्वसंध्येला असे दोन युवक अमरावतीमध्ये दाखल झाले की, ज्यांचे कौतूक करावे तेवढे कमीच आहे, परंतू त्यांच्या या आवडीला कोणीही सॅल्यूटच करेल.

पियूष पुंबादिया (21) आणि मंथन पुंबादिया (19) अश्या या उमद्या तरुणांचे नावे आहे. हे दोन्ही युवक चुलत भाऊ असून ते गुजरात मधील सुरत येथील रहिवाशी आहेत. ते आता सुरत ते जगन्नाथ पुरी असा 1700 किलोमीटर चा सायकलने प्रवास करित आहेत. ही त्यांची तिसरी वेळ असून यापुर्वी त्यांनी सूरत ते अयोध्या आणि सूरत ते केदारनाथ असा सायकलने जोखमीचा प्रवास केला आहे.

मंथन हा बी.ए.मध्ये शिक्षण घेत आहे, तर पियुष हा दुचाकी मॅकेनिकल आहे. अयोध्येत प्रभू श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर आपणही अयोध्येला जावे, परंतू असामान्य पध्दतीने ही या दोघांची ईच्छा होती. त्यांनी सायकलने अयोध्या गाठण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला आई-वडीलांच्या विरोधाचा सामना त्यांना करावा लागला. त्यांनी आपल्या आई-वडीलांना विश्वासात घेवून परवानगी मिळविली आणि 15 डिसेंबर 2023 सुरत ते अयोध्या असा सायकलने प्रवास सुरु केला. 500 वर्षानंतर श्रीरामाचे मंदिर तयार झाले आहे, ते पहायला जाण्याची मनात इच्छा होती. सायकलने अयोध्येला जाताना वेगळाच अनुभव आणि आनंद मिळाल्याचे या युवकांनी सांगितलं. ते 20 जानेवारी 2024 या कालावधीत सर्वप्रथम 1400 किलोमीटर पार करून सुरतहून अयोध्येला पोहचले.

### अयोध्येनंतर थेट केदारनाथची योजना

अयोध्येनंतर केदारनाथ ला जाण्याकरिता या भावंडांनी सुरतहून सायकल ने 28 एप्रिल 2024 कूच केली. ते 30 मे 2024 रोजी केदारनाथमध्ये पोहोचले. सायकलने प्रवास करत असताना मनाला खूप आनंद मिळतो, म्हणून आम्ही सायकलने प्रवास करतो असे या भावडांनी सांगितले.

### आतापर्यंत 598 किलोमीटरचा प्रवास

युवकांनी 'दै.महासागर' ला सांगितले की, पंचर दुरस्तीचे सर्व साहित्य आमच्या सोबत आहे. सायकल चालविताना जे साहित्य पाहिजे ते सर्व आमच्याकडे आहे. नागरिकांचे चांगले सहकार्य लाभते. आतापर्यंत कोठेही सायकल पंचर झाली नाही. आमच्या सोबत टेन्टसुध्दा आहे. ज्या ठिकाणी आम्हाला कुठलंच ठिकाण थांबण्यासाठी मिळालं नाही, तेथे आम्ही आमच्या टेन्ट टाकतो. ज्या ठिकाणी पेट्रोल पंप आहे. त्या ठिकाणी टेन्ट टाकून थांबतो. अमरावती पर्यंत 598 किलोमीटरचा प्रवास झाला असून हा प्रवास अतिशय आनंदात झाला आहे. आम्हाला पाहून नागरिकांना खूप आनंद होतो, ते स्वागत करुन आमची मदत करतात. आम्ही दोघेही सकाळी आठ ते नऊच्या दरम्यान सायकल चालवायला सुरुवात करतो. रोज 80 ते 100 किलोमीटर आम्ही सायकल चालवीत आहे. अमरावतीमध्ये अंबा मातेचे दर्शन घेतल्यानंतर आता उद्या रविवारी दिनांक 12 जानेवारीला युवक दिनाच्या औचित्यावर आम्ही पुढच्या प्रवास सुरु करणार आहे.

### तिसऱ्यांदा जगन्नाथ पुरी जाण्याची योजना

हे युवक आता तिसऱ्यांदा 5 जानेवारी 2025 ला सुरतहून जगन्नाथ पुरी येथे जाण्यासाठी निघाले. तिसऱ्यांदा सुरत ते जगन्नाथ पुरी असा 1700 किलोमीटरचा प्रवास ते पूर्ण करणार आहेत. ते विहारा मंदिर, धुळे, जळगाव, मलकापूर होत अमरावतीला पोहोचले आहे. मलकापूर येथे विनोद चौधरी, दिनेश शर्मा व मित्रमंडळी त्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली होती. त्याचबरोबर ते अकोला येथे एका मंदिरात थांबले होते. विनोद चौधरी यांनी नागपूरपर्यंत राहण्याची व्यवस्था करुन दिली आहे. आतापर्यंत कुठलीच अडचण आली नसल्याचे या युवकांनी सांगितले.

# ताण, तणाव मुक्तीकरीता क्रीडा स्पर्धा संजिवनीचे काम करते!

## जिल्हाधिकारी सौरभ कटीयार | जिल्हास्तरीय महसूल व क्रीडा सांस्कृतिक स्पर्धेचे उद्घाटन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )-** गेल्या वर्षी लोकसभा व विधानसभेच्या दोन निवडणुका झाल्या. त्यामध्ये अधिकारी, कर्मचारी यांनी कमालीची एकजूट दाखवली यामुळेच निवडणुका यशस्वीरित्या पार पडल्या. अशीच एकजूट आपण कायम राखावी, शासकीय, जनतेची कामे आणि दैनंदिनी कामकाज करत असताना ताण तणाव घालवण्यासाठी क्रीडा स्पर्धा संजीवनीचे काम करतात, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांनी केले.

जिल्हास्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक क्रीडा स्पर्धा जवारहरलाल नेहरू विभागीय क्रीडा संकूल येथे 10 ते 12 जानेवारीदरम्यान पार पडल्या. यावेळी अध्यक्षस्थानावरून जिल्हाधिकारी सौरभ कटीयार बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी सौरभ कटियार होते. स्पर्धेचे उद्घाटन अमरावती शहराचे पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्रा, महानगर पालिका आयुक्त सचिन कलंत्रे, पोलिस अधीक्षक विशाल आनंद, सहाय्यक जिल्हाधिकारी मिन्नू पी. एम., अप्पर जिल्हाधिकारी, सहाय्यक जिल्हाधकारी, अमर राऊत, विवेक जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनिलकुमार भटकर, क्रीडा व युवा सेवाचे उपसंचालक शेखर पाटील, उपजिल्हाधिकारी निवडणूक शिवाजी शिंदे, उपजिल्हाधिकारी पुनर्वनसन प्रजेनजित चव्हाण उपस्थित होते.



यावेळी पोलीस आयुक्त नवीन चंद्र रेड्डी यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात जीवनामध्ये खेळाचे महत्व अधोरेखित केले. नियमित खेळामुळे आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे आरोग्य चांगले राहते. सर्वांनी दैनंदिन कामासोबत विविध खेळ खेळण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दैनंदिनी कामकाज करत असताना ताण तणाव घालवण्यासाठी विविध खेळ खेळून आरोग्य सूदृढ ठेवण्याकरिता प्रयत्न करावे, असे आवाहन केले. महानगरपालिका आयुक्त अमरावती सचिन कलंत्रे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संचिता महापात्र, पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण विशाल आनंद यांनी यावेळी खेळाडूंना मार्गदर्शन केले. प्रास्तविक व आभार प्रदर्शन मोर्शी उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी केले. संचालन कृष्णा पखाले यांनी केले. याप्रसंगी सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार] सर्व नायब तहसीलदार, सहाय्यक महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, महसूल सहाय्यक, ग्राममहसूल अधिकारी, महसूल सेवक, शिपाई यांच्यासह महसूल विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महसूल खेळाडूंनी परिधान केलेले ट्रॅकसूट सर्वांचे लक्ष वेधत होते. क्रीडा स्पर्धा सुरू असलेल्या ठिकाणी संघटनांचे पदाधिकारी व खेळाडूंचे बॅनर्सही ठिकठिकाणी निदर्शनास येत होते.

## शेतीच्या वादातून भावाला धमकी

**अमरावती** - शेतीच्या वादातून आपल्या भावालाच जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी प्रदीप शामराव बमनोटे आणि त्याचा भाऊ विजय बमनोटे यांच्यात शेतीच्या वाद आहे. दरम्यान प्रदीपने जनावरे चरण्यासाठी शेतात सोडले असता विजयने 'मी तुझा खून करीन' असे म्हणत वाद घालत मारहाण केली. प्रदीपच्या तक्रारीवरून 9 जानेवारी रोजी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## स्वयंपाक करताना महिलेचा विनयभंग

**अमरावती** - चिखलदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारी 31 वर्षीय महिलेचा विनयभंग करण्यात आला. महिला ही घरात जेवण बनवत होती. दरम्यान आरोपी किसना शंकर हेकडे याने घरात शिरून विवाहितेचा हात पकडून विनयभंग केला. महिलेच्या तक्रारीवरून 9 जानेवारी रोजी पोलिसांनी किसना हेकडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


# कारागृहाच्या बाहेर जाण्याकरिता डॉक्टरला कैद्याची धमकी

## फ्रेजरपुरा येथे कैद्याविरुध्द गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.11 )-** येथील मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या एका कैद्याने कारागृहातून बाहेर जाण्याकरिता कारागृहातील वैद्यकीय अधिकाऱ्याला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना 9 जानेवारी रोजी सकाळी 11 ते 11.30 च्या दरम्यान घडली. वैद्यकीय अधिकारी डॉ.मोहमद राजीक मोहम्मद रफिक (40, रा. चपराशीपुरा, अमरावती) याच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी कैदी नितीश अनिल जयस्वाल याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. मोहम्मद राजिक यांची जिल्हा मध्यवर्ती कारागृहात वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. 9 जानेवारी रोजी सकाळी 11 वाजता ते कैद्यांची आरोग्य तपासणी करत होते. त्यानंतर आरोपी नितेश जयस्वाल तेथे आला आणि म्हणाला की, मी खूप आजारी आहे, मला बाहेरच्या रुग्णालयात पाठवा. त्यानंतर डॉ.मोहमद राजिक यांनी कारागृहातील पॅथॉलॉजी लॅबमध्ये जाऊन रक्त तपासणी करण्यास सांगितले. त्यावर नितेश जयस्वाल आक्रमक




झाला आणि म्हणाला की, मला बाहेरच्या हॉस्पिटलमध्ये पाठवा. त्यानंतर त्याने डॉक्टरला शिवीगाळ करून सरकारी कामात अडथळा आणला. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्याला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर वैद्यकीय अधिकारी डॉ.मोहम्मद राजिक यांनी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

# लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर लैंगिक अत्याचार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 ) -** लग्नाचे आमिष दाखवून एका महिलेवर लैंगिंक अत्याचार केल्याची घटना खोलापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत 9 जानेवारी रोजी उघडकीस आली आहे. महिलेच्या नावाने भाड्याने खोली घेऊन दोघेही पती-पत्नीसारखे एकत्र राहत होते. दरम्यान, आरोपीचे अनेकवेळा शारीरिक संबंध होते. महिलेने लग्नाचा आग्रह धरला असता त्याने तिच्याशी लग्न करण्यास नकार दिला. यामुळे पिडित महिलेने गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी रोशन श्रीकृष्ण ठाकरे (35, रा. म्हैसपूर, भातकुली) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. तक्रारदार महिलेच्या पतीचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे ती आईच्या घरी राहत होती. दरम्यान, 2022 मध्ये त्याची फोनवरून आरोपी रोशन ठाकरेसोबत ओळख झाली होती. त्यानंतर आरोपी रोशनने महिलेला लग्नाचे आमिष दाखविले आणि त्यानंतर ते दोघेही पती-पत्नीसारखे एकत्र राहू लागले. दरम्यान, आरोपी रोशन याने महिलेसोबत अनेकवेळा बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले. मात्र महिलेने लग्न करण्याचे बोलले असता आरोपी रोशनने नकार दिला. त्यामुळे महिलेने खोलापुर पोलिस ठाण्यात धाव घेतली.

# मांगीलाल प्लॉटमध्ये चोरी

## घराचे दार व ग्रील गेट तोडून केला प्रवेश

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 ) -** पुण्यात राहणाऱ्या मुलाला भेटण्यासाठी गेलेल्या कुटुंबाच्या घराला अज्ञात चोरट्यांनी टार्गेट केले आणि घराचे दार व ग्रील तोडून 1 लाख 25 हजार रुपयांचे दागिने चोरून नेले. ही घटना 9 जानेवारी रोजी उघडकीस आली आहे. याप्रकरणी श्याम देशपांडे यांच्या फिर्यादीवरून शहर कोतवाली पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस तपासादरम्यान चोर हे घरासमोरील



सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याचे दिसून आले आहे. सिटी कोतवाली पोलिस स्टेशन हद्दीतील मांगीलाल प्लॉट येथे राहणारे श्याम कुष्णराव देशपांडे (70) आणि त्यांची पत्नी 15 दिवसांपूर्वी आपल्या मुलाला भेटण्यासाठी पुण्याला गेले होते. दरम्यान शेजारी राहणाऱ्या जाधव यांनी देशपांडे यांना घराचे दार व ग्रीलचे कुलूप तोडून चोरी झाल्याची माहिती दिली. त्यानंतर 9 जानेवारीला श्याम हे पुण्याहून घरी परतला. त्यानंतर त्याने घरात जाऊन पाहिले असता सर्व वस्तू अस्तव्यस्त अवस्थेत होत्या. चोरट्यांनी कपाटातून 1 ग्रॅमचे छोटे सोन्याचे नाणे, 4 ग्रॅमची चेन, 30 ग्रॅमचे ब्रेसलेट असा एकूण 1 लाख 22 हजार रुपयांचा माल चोरून नेला. यासोबतच एसबीआय बँकेचे ओळखपत्रही चोरीला गेले.

याशिवाय चोरट्यांनी तोडफोड करून दीड लाख रुपयांचे नुकसान केल्याची तक्रार श्याम देशपांडे यांनी केली आहे. चोरीची घटना समोरील घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. श्याम देशपांडे यांच्या फिर्यादीवरून शहर कोतवाली पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# अज्ञात वाहनांच्या धडकेत दुचाकीवरील इसमाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.11 )-** भरधाव अज्ञात वाहनांच्या धडकेत दुचाकीवरील इसमाचा मृत्यू झाल्याची घटना नांदगाव पेठ पोलीस स्टेशन समोरील उड्डाणपुलाखालील रस्त्यावर 10 जानेवारी रोजी सायंकाळी 7 वाजताच्या सुमारास घडली. प्रकाश रमेशराव बारब्दे (51, रा. रामनगर प्लॉट नंबर 5, महाजनवाडी, वंदे नगर, हिंगणा, नागपुर.) असे मृताचे नाव आहे.

प्रकाश बारब्दे हा अमरावतीला आपल्या दुचाकीने काही कामानिमित्त आला असावा. तो दुचाकी क्रमांक एमएच 4ह्र एसडब्ल्युओ ह्र179 ने नांदगाव पेठ समोरील उड्डानपुलाखालून जात असताना, त्याच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने धडक दिली. या अपघातानंतर वाहन पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली. नांदगाव पेठ पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून हायवेच्या ?म्बुलन्सद्वारे मृतदेह शवविच्छेदनाकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविला. या घटनेची माहिती जिल्हा सामान्य रुग्णालयातून काही समाज सेवकाच्या माध्यमातून मृताच्या नातेवाईकाला देण्यात आली. नांदगाव पेठ पोलिस अज्ञात वाहनाचा शोध घेत आहे.

# अचलपूरमध्ये 51 कुंडीय श्री सहस्त्रचंडी महायज्ञ

- संगीतमय श्रीराम कथा तथा विराट राष्ट्रीय साध्वी संत संमेलन
- 17 ते 26 जानेवारी पर्यंत राहणार धार्मिक कार्यक्रमांची मांदियाळी

**मो.अजहरुद्दीन**

**अचलपूर, ( दि.11 )-** अचलपूर- परतवाडा मार्गावरील रेल्वे स्टेशन जवळील राम वाटिका येथे 51 कुंडीय श्री सहस्त्रचंडी महायज्ञ व संगीतमय श्रीराम कथा त विराट राष्ट्रीय साध्वी संत संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या 17 जानेवारी पासून या विशाल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात असून 17 ते 26 जानेवारी पर्यंत शहरात विविध धार्मिक कार्यक्रमाची मांदीयाळी राहणार आहे. आयोजित एका पत्रकार परिषदेत आयोजक साध्वी नर्मदा दासी माताजी यांनी ही माहिती दिली. यावेळी श्री श्री 108 विष्णुदास मोहनदास महाराज, सुदर्शन दास महाराज, सामाजिक कार्यकर्ते राजेश अग्रवाल, राजेश



खोलापुरे, राजू शर्मा, गिरिधर चरपटे प्रामुख्याने उपस्थित होते.

गेल्या वर्षी 6 नोव्हेंबर रोजी ध्वजारोहण शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. तेव्हापासून संगीतमय श्रीराम कथा व राष्ट्रीय साध्वी संत संमेलनाचे आयोजनाची तयारी प्रगतीपथावर असल्याचे साध्वी नर्मदा दासी माताजी यांनी सांगितले. या संमेलनात अंतरराष्ट्रीय कथा वाचक श्री श्री 1008 श्रीमहंत श्रीराम मोहनदास रामायणी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. 17 जानेवारी रोजी भव्य कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कलश यात्रा परतवाड्यातील वाघा माता संस्थान येथून प्रारंभ होणार आहे. सिव्हिल लाईन होत ही कलश यात्रा छोटा बाजार, नगर परिषद, दुराणी चौक, सदर बाजार, मिश्रा लाईन, महावीर चौक, पेंशनपुरा, लक्कड बाजार होत कथा स्थळ राम वाटिका अचलपूर येथे पोहचेल.



### 18 जानेवारीला महायज्ञ

18 जानेवारी रोजी सहस्त्र चंडी महायज्ञ व महारुद्रा अभिषेक होणार आहे. दुपारी 3 ते 7 पर्यंत श्री संगीतमय श्री राम कथा आणि संत संमेलन होणार आहे. तसेच भजन संध्या असे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सुदर्शन दास महाराज यांनी दिली.

# कार झाडावर आदळून 1 ठार



## तीन तरुण जखमी

## दत्तापूर ते यवतमाळ मार्गावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे,( दि.11 )-** दत्तापूर ते यवतमाळ मार्गावरील अग्रवाल पेट्रोल पंपाजवळ फियाट कार झाडावर आदळून जळगाव आर्वी येथील युवक जागीच मृत्यू झाला. तर कारमध्ये प्रवास करणारे तीन तरुण जखमी झाले. गणेश गजानन शेळके असे मृताचे नाव असून तो जळगाव आर्वी तहसील येथील रहिवासी होता.

मिळालेल्या माहितीनुसार, गणेश गजानन शेळके (22), कुश मेश्राम (21, रा. साईनगर परसोडी), अक्षय राजू तोग (19, रा. शाहपूर) आणि यश खुशाल डोहळे (20, पार्क धामणगाव) हे कार क्रमांक एमएच 02 - सीबी 7907 मध्ये बसून धामणगावकडे येत होते. दरम्यान, यवतमाळ ते दत्तापूर रोडवरील अग्रवाल पेट्रोल पंपाजवळ त्यांचे वाहन झाडावर आदळले. या अपघातात गणेश गजानन शेळके या युवकाचा जागीच मृत्यू झाला. तर कुश मेश्राम (21), अक्षय राजू टोग (19), यश डोहळे (20) जखमी झाले. जगदीश रवींद्र शेळके यांनी या घटनेची तक्रार दत्तापूर पोलिसांत दिली आहे. पुढील तपास ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शहरातील स्वच्छते बाबत हयगय नाही!

## महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांचा इशारा ■ स्वच्छतेच्या कामांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.11 )** – महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी 11 जानेवारी रोजी सकाळी शहरातील बस डेपो, राजकमल चौक, गांधी चौक, परकोट, नागपुरी गेट, बापट चौक, रविनगर रोड, नवाथे परिसरातील स्वच्छतेच्या कामांसह आयसोलेशन दवाखान्याची पाहणी केली. स्वच्छतेबाब हयगय खपवून घेतली जाणार नाही, अशी तंबी यावेळी आयुक्त कंलत्रे यांनी प्रशासकीय यंत्रणेतील संबंधितांना दिली. त्यांनी स्वच्छतेच्या कामाचा आढावा घेत हजेरी बुकांची तपासणी केली.

स्वास्थ निरीक्षक, सफाई कामगार व घंटागाडी कर्मचाऱ्यांशी चर्चा करत स्वच्छता करतांना रस्त्याचे साईड पट्टी स्वच्छता करण्यात यावी, अशी सक्त सूचना त्यांनी केली. कचरा परिसर स्वच्छ करुन त्वरित तो कचरा घंटागाडीत टाकण्याबाबत निर्देश दिले. मार्केट परिसरात स्वच्छतेप्रमाणेच प्रत्येक विक्रेत्यांकडे कचर्यासाठी डबा असलाच पाहिजे, असे निर्देश देऊन मार्केट जवळील कंपोस्ट पिट्स व्यवस्थितरित्या कार्यान्वित राहतील. याकडेही बारकाईने लक्ष देण्याच्या तसेच कोणाकडेही प्लास्टिक पिशवी असताच कामा नयेत, असा कडक इशारा आयुक्तांनी दिला.



या पाहणी दरम्यान महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी आयसोलेशन दवाखान्याची पाहणी केली. महानगरपालिकेच्या आयसोलेशन दवाखान्यामध्ये वैद्यकीय सेवा सुरू आहे. दवाखान्यामध्ये कर्मचाऱ्यांची संख्याची व औषधांचा पुरवठ्याची माहिती महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी घेतली. यावेळी आयुक्तांनी आयसोलेशन दवाखान्याला भेट देऊन रुग्णालयाच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी आयुक्तांनी सर्व आशांना निर्देश दिले की, सदर परिसरात व शाळांमध्ये आरोग्या बाबत जनजागृती करावी व शिबिराचे आयोजन करावे. एचएमपीव्ही हा एक सामान्य श्वसन विषाणू आहे. ज्यामुळे व श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास (सर्दीसारख्या) कारणीभूत ठरतो. याबाबत आवश्यक दक्षता घेण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले. या पाहणी दरम्यान सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी, दवाखान्यातील स्टाफ, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# नायलॉन मांजा वापराल तर खबरदार...!

## दर्यापूर नगर परिषद ॲक्शन मोडवर

**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर** – नवीन वर्षातील पहिला आनंदाचा सण म्हणजे मकार संक्रांत. हा सण दिवसभर पतंग उडवून, तर सायंकाळनंतर तीळगूळ वाटून साजरा केला जातो. मात्र मानवासह पक्ष्यांना घातक ठरू पाहणारा नायलॉन मांजाचा पतंग उडविण्यासाठी वापर करू नये, अन्यथा दर्यापूर नगर परिषद प्रशासन अँक्शान मोडवर असून, जर नगर परिषद हद्दीत कुणी नायलॉन मांजा विक्री करताना आढळून आल्यास आणि वापर करताना आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल. असा इशारा दर्यापूर नगर परिषद प्रशासनाकडून देण्यात आला आहे.



जर नगर परिषद हद्दीमध्ये कुणी नायलॉन मांजाची विक्री अथवा पतंग उडविण्यासाठी वापर करत असेल असल्यास त्याची माहिती स्वच्छता विभाग परिमल देशमुख, मोहम्मद शफिक शेख, प्रियंका खोरगडे, सुशील मार्वे, ऐश्वर्या भोगे यांना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नायलॉन मांजाचा वापर केल्याने अनेक नागरिकांना आणि पशु-पक्ष्यांना जीव गमवावा लागलेला आहे.

त्यामुळे आपण आनंदोत्सव साजरा करत असताना इतर कुणाला इजा होणार नाही, कुणाचा जीव जाणार नाही, याची दक्षता घेणे गरजेचे आहे. आपल्या कृत्यामुळे इतरांवर संकट ओढविणार नाही, यासाठी नागरिकांनी स्वत:हून नायलॉन मांजाचा वापर टाळावा असे दर्यापूर नगरपरिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी नंदू परळकर यांनी केले आहे.

# अचलपूर तहसील कार्यालयात शुकशुकाट


## पुर्व सूचना न देता अधिकारी, कर्मचाऱ्यांची दांडी



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, ( दि.11 )**– अचलपूर तहसील कार्यालयात आठवड्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच शुक्रवारी शुकशुकाट पहायला मिळाला. अधिकारी-कर्मचाऱ्यांनी चक्क दांडी मारल्याचे दिसत होते. याप्रकारामूळे अनेक नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला. अचलपूर कार्यालयाला अनेक गावखेडे जोडलेली आहे. आपल्या विविध कामाकरिता विविध गावांतील नागरिक येथे येतात, परंतू कुठलीही पुर्व सूचना न देता येथील बेपत्ता असलेले अधिकारी- कर्मचाऱ्यांमूळे त्यांचा भ्रमनिरास होतो. शुक्रवारी असाच प्रकार तहसील कार्यालयात पहायला मिळाला. इतर कर्मचाऱ्यांना माहिती विचारली असता त्यांनी सांगितले की अमरावती येथे महसूल क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले आहे. तहसीलदार, नायब तहसीलदार, अव्वल कारकून सह इतर कर्मचारी त्यामध्ये सामील होण्यासाठी अमरावती येथे गेले आहेत. परंतु सामान्य नागरिकांची या प्रकारामूळे तारांबळ उडून त्यांना आर्थिक नुकसानाचा सामना करावा लागला. एक व्यक्ती तर अकोला येथून महसुली तारखेसाठी उपस्थित राहण्यासाठी तहसीलदार कार्यालयात आला होता, परंतु त्यालाही तहसीलदार कार्यालयाकडून पुर्व सुचना नसल्याने तहसीलदार कक्षाचे कुलुप बंद दार पाहुन आल्या पावली परत जावे लागले.

# वाचनाची आवड नवीन पिढीला व्हावी-आमले

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाअंतर्गत सामुहिक वाचन



**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड, ( दि.11 )**– क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक वाचनालय हिवरखेड येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाअंतर्गत सामुहिक वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांचा तसेच वाचकांचा सहभाग लाभला. वाचनसंस्कृती वृध्दिंगत व्हावी वाचनाची आवड नवीन पिढीला व्हावी याकरीता हा उपक्रम निश्चितच उपयोगी पडेल असे संस्थेच्या सचीव वैशाली आमले मनोगत व्यक्त केले.

या उपक्रमांमध्ये बिगिनर इंग्लीश स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज व कमलाबाई नामदेवराव आमले पब्लिक स्कुल हिवरखेड येथील विद्यार्थी, शिक्षक, पालक व वाचक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# म.फुले महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची आविष्कार स्पर्धेसाठी निवड

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड ( दि.11 )** – स्थानिक महात्मा फुले महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थीनींची राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातर्फे निवड करण्यात आली.

नुकतेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा आयोजित विद्यापीठस्तरीय दोन दिवसीय आविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. राज्यपालांच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती निर्माण व्हावी म्हणून आविष्कार स्पर्धा आयोजित करण्यात येत असते. स्पर्धेमध्ये महात्मा फुले कला, वाणिज्य व सितरामजी विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील एम एस्सी भाग-2 च्या स्नेहल हेटे व कल्याणी गणोरकर यांनी पदवीत्तर गटातून- ॲग्रिकल्चर अँड ॲनिमल हसबंडरी या संवर्गातून तृतीय क्रमांक प्राप्त केला. विद्यार्थीनींनी 'शेतकऱ्यांसाठी सुरक्षा काठी' या प्रोजेक्टचे सादरीकरण केले. तज्ञ परीक्षकांद्वारे परीक्षण करून स्नेहल हेटे या विद्यार्थिनीचे राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेकरिता निवड आणि अमरावती विद्यापीठाचे कलर कोट प्राप्त केला. समारोपीय कार्यक्रमांमध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ फडणवीस, अविष्कार सेलचे



समन्वयक डॉ. वैशाली धनविजय यांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. डॉ बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, लोणेरे येथे होऊ घातलेल्या राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेमध्ये महात्मा फुले महाविद्यालयाचे तसेच अमरावती विद्यापीठाचे नेतृत्व करणार आहे.विद्यार्थिनींनी घवघवीत यश प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिलीप हांडे, रसायनशास्त्र विभागप्रमुख तथा मार्गदर्शक डॉ. राजेश गणोरकर, अविष्कार समन्वयक डॉ. युवराज तामगाडगे, विलास हिरनवाडे, डॉ. अतुल वंजारी, वैभव गुल्हाने, सतीश कोलटेके, प्रियंका बेलसरे यांनी निवड झालेल्या विद्यार्थीनींचा सत्कार केला.

# आजपासून युवा सप्ताहाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.11 )**– क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व एकलव्य गुरुकुल स्कुल, नांदगाव खंडेश्वर तसेच विविध शैक्षणिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवा दिन व युवा सप्ताहाचे आयोजन 12 ते 19 जानेवारी दरम्यान करण्यात आले आहे. स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिवस दि. 12 जानेवारी देशभर राष्ट्रीय युवा दिन म्हणुन साजरा केला जातो. युवकांचा सर्वांगिण विकास करणे आणि राष्ट्रीय व सामाजिक कार्यात सहभागी होणे याकरीता युवकांना उद्युक्त करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. तसेच राज्यामध्ये राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांचा जन्मदिन याच दिवशी म्हणून साजरा केला जातो. या अंतर्गत युवा सप्ताह अंतर्गत रविवार, दि. 12 जानेवारी रोजी सकाळी 11 वाजता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला आहे.



# फुबगावमध्ये भक्तांची मांदियाळी

## सुरेश बाबाच्या समाधीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

### संतविचाराने जगण्यातच साफल्य..!

### ह.भ.प. देवदत्त महाराज अढाऊ

**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव खंडेश्वर,( दि.11 )** – नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील दरवर्षी फुबगाव येथे श्री संत सुरेश बाबा जन्मोत्सव निमित्त भागवत सप्ताह गेली आठ दिवस ह.भ.प. धनंजय पाठक महाराज यांच्या सुमधुर वाणितुन भक्त मंडळी श्रवण केले, गेली आठ दिवस दैनंदिन कार्यक्रम पार पडले.

काकडा आरती, ग्रामसफाई, संत सुरेश बाबा यांचे अमृतुल्य लीला ग्रंथाचे पारायण, भजन, हरीपाठ, किर्तन महोत्सव ह.भ.प. मुकेश महाराज चुडे , ह.भ.प. सुश्री वैष्णवीताई ओकार यांचे किर्तन पार पडले. आठव्या दिवशी संपूर्ण फुबगाव नगरी मधुकर टाळ मुंदगाच्या गजरात लाखो संख्येने दिंडी सह जनसमुदाय सहभागी झालेल्या होते. त्यामध्ये सुरेश बाबा च्या रथा मध्ये नगरप्रदिक्षणा करुन भक्त मंडळी नंतर काल्याचे किर्तन ह.भ.प. देवदत्त महाराज यांचे झाले व सांगत पंचक्रोशितील टाळकरी मंडळी व गावकरी उपस्थित होती. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन संत सुरेश बाबा संस्थान तर्फे आयोजित करण्यात आले होते. अनेक सेवाभावी संस्था सेवा देण्यासाठी मंदिर परिसरात कार्यरत दिसत होते, अनेकजण दर्शनासाठी व कार्यक्रमाला भेट देण्यासाठी आले होते.

# क्रीडा स्पर्धेच्या उत्सवात सर्वांनी सहभागी व्हावे-गटशिक्षणाधिकारी

## तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप




**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.11 )**– कला व क्रीडा स्पर्धा हा एक प्रकारचा मोठा उत्सवच तो असतो. त्यामध्ये खेळाडू बालकलावंत तसेच शिक्षक वृंद आनंदाने सहभागी होऊन खरा आनंद घेत असतात. त्यातून मिळणारा आनंद व उत्साह विद्यार्थ्यांना यांच्या शैक्षणिक वाढीसाठी ऊर्जा देणारा ठरतो, असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी (पंचायत समिती, वरुड) विनोद गाढे यांनी केले. ते राजुरा बाजार येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणामध्ये तालुकास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात 7 जानेवारी रोजी बक्षीस वितरण समारंभाचे कार्यक्रमाध्यक्ष म्हणून बोलत होते.


यावेळी पं.स.गटविका अधिकारी सतीश देशमुख, विशेष अतिथी म्हणून सरपंच राजुरा बाजार निलेश धुर्वे, उपसरपंच मनोहरराव भोंडे, सुधाकरराव डाफे, अमोल दाभाडे, सुरेश भोयर, शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप बुरंगे, तालुका समन्वयक दशरथ गाडगे, शिक्षण विस्तार अधिकारी स्नेहा राऊत, शालेय पोषण आहार चे अधीक्षक अनिल चहांदे, केंद्रप्रमुख सुनील राठोड, भगवंत गजभिये, रंजन राठोड, अरविंद वानखडे, धनराज टिकस, मुख्याध्यापक रमेश सहारे, स्वाती काकडे, अश्विनी अंबाडकर, शोभा भोरे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

बक्षीस वितरण समारंभाचे प्रास्ताविक क्रीडा संयोजक दिलीप बुरंगे यांनी केले. वितरणाच्या समारोपीय कार्यक्रमांमध्ये विजय संघ तसेच वैयक्तिक स्पर्धा जिंकलेले खेळाडू यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन उज्वला जावळे व रंजन राठोड यांनी केले तर मान्यवरांचे तसेच उपस्थितांचे आभार रमेश सहारे यांनी मानले.

# अमरावती येथून दर रविवारी सावंगा करिता बससेवा

**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे,( दि.11 )**– तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे भाविकांना दर्शनाकरिता सुरक्षित प्रवास सुविधा देण्याचे दृष्टीने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे वतीने चांदुर रेल्वे आगर मधून दर रविवारी सावंगा (विठोबा) करिता चांदुर रेल्वे आणि अमरावती बसस्थानक मधून 4 बस फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

सदर फेरी चांदुर रेल्वे- मांजरखेड- चिरोडी- सावंगा(विठोबा)- लालखेड-मोगरा- भानखेड-अमरावती या मार्गे दुहेरी बससेवा राहील.तरी सर्व भाविक भक्तांनी अवैध वाहनांनी प्रवास न करता एस.टी.बसने सुरक्षित प्रवास करून सहकार्य करावे,असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे,



उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल सर्व विश्वस्त विनायक पाटील,वामण रामटेके, गोविंद राठोड, दिगांबर राठोड, अनिल बेलसरे, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, वैभव मानकर, स्वप्निल चौधरी विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

**भाविकांना दिलासा**

### अश्या राहतील फेऱ्या

- सकाळी 10 वाजता- चांदुर रेल्वे ते अमरावती मार्गे सावंगा (विठोबा)
- सकाळी 11 वाजता- अमरावती ते चांदुर रेल्वे मार्गे सावंगा (विठोबा)
- सायंकाळी 5 वाजता- चांदुर रेल्वे ते अमरावती मार्गे सावंगा (विठोबा)
- सायंकाळी 6 वाजता- अमरावती ते चांदुर रेल्वे मार्गे सावंगा (विठोबा)

(ही फेरी पुरेसे प्रवासी उपलब्ध असल्यास सोडण्यात येईल.)

# चांदुर बाजार कृ.उ.बा.समितीच्या सभापती सतीश मोहोड तर उपसभापती विनोद राऊत

## माजी मंत्री बच्चू कडू यांची उपस्थिती

**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर बाजार,( दि.11 )**– चांदुर बाजार कृषी उत्पन्न बाजार समिती च्या सभापती पदी सतीश मोहोड तर उपसभापती विनोद राऊत यांची शुक्रवारी (दि.10) अविरोध निवड करण्यात आली. ही निवडणूक कृषी उत्पन्न बाजार समिती च्या सभागृहात पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहायक निबंधक सहकारी संस्था चांदूर बाजार स्वरूपा जुमडे यांनी ही निवडणूक प्रक्रिया पार पाडली.

चांदुर बाजार कृषी उत्पन्न बाजार समिती च्या सभापती आणि उपसभापती पदाची पार पडली. येथे प्रहार एकहाती सत्ता आहे, त्यामूळे ही निवड प्रक्रीया साधी, सोपी झालेली पहायला मिळाली.

यावेळी संचालक मंगेश देशमुख, अमोल लंगोटे, नंदकिशोर वासनकर, आश्विन भेटाळू, राजेंद्र याऊल, गजेंद्र गायकी, माधवराव धोंडे, विनोद जवंजाळ, मनोज नागलिया, संदीप चरपे, मनोज वाटाणे, रामदास भोजने, प्रमोद वाकोडे, अनिल खैरकार, ललिता पोहोकार, मीना देशमुख, लतीफ खान कादर, मनीष भारंबे, शिवाजी बंड, प्रदिप बंड, सचिन पिसे, बबलू देशमुख, निखिल ठाकरे, विशाल आवारे, आशिष बंड, दिपक भोंगाडे, अभिजीत पोहोकार यांच्यासह या निवड प्रक्रीयेच्यावेळी मोठ्या संख्येने प्रहार कार्यकर्ते तसेच सहकार क्षेत्रात काम करणारे नेते मंडळी उपस्थित होते. अचलपूर विधानसभा निवडणुकीत आमदार बच्चू कडू यांचा पराभव झाल्यानंतर पराभवाची जबाबदारी स्विकारत सभापती राजेंद्र याऊल, उपसभापती गजेंद्र गायकी यांनी आपला राजीनामा बच्चू कडू यांच्या कडे दिला होता. त्यानंतर हे दोन्ही पद रिक्त झाले होते, हे विशेष.



एक सामान्य कार्यकर्ता ते सभापती हा प्रवास खूप मोठा आहे. पण माजी राज्यमंत्री बच्चू कडूंनी माझ्यासाठी तो प्रवास लहान केला. माझ्या इतर संचालक मंडळांनी देखील माझ्यासाठी खूप कष्ट केले, त्यांचे आभार. शेतकऱ्यांना कोणताच त्रास होणार नाही, तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी नवनवीन धोरण राबवले जातील, अशी मी ग्वाही देतो.

**सतीश मोहोड,**
**सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती चांदूर बा.**

शेतकऱ्यांना कुठला त्रास होणार नाही यांचे योग्य धोरण ठरवून काम करा. तसेच शेतकरी या बाजार समिती मधून हताश होवून जावू नये याकडे सभापती आणि उपसभापती तसेच संचालक यांनी लक्ष ठेवून काम करावे. प्रहार पक्ष हा कधीच जात-पात, धर्माचा विचार करून राजकारण करत नाही. सभापती , उपसभापती, संचालक यांना शुभेच्छा आणि जे या निवडणूक साठी झटले सामान्य कार्यकर्ते, नेते त्यांना देखील धन्यवाद देतो.

**बच्चू कडू, माजी राज्यमंत्री तथा प्रहार संस्थापक.**

# आमदारांच्या हिंदकेसरी शंकरपटाने लावले बहिरम यात्रेला चार चांद

## समारोपात बक्षीसांची उधळण

**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, ( दि.11 )**– नवनिर्वाचित आमदार प्रविण तायडे मित्र मंडळाने बहिरम यात्रेत आयोजित केलेल्या हिंदकेसरी शंकरपटाने यात्रेला चारचांद लावले. राज्यभरातून आलेल्या दर्शकांनी या आयोजनाची भरभरुन स्तुती केली. शंकरपटाच्या अखेरच्या दिवशी म्हणजेच समारोपीय कार्यक्रमात विजयी बैल जोड्यांवर बक्षीसाची उधळण करण्यात आली.

सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या चांदुरबाजार तालुक्यातील श्री क्षेत्र बहिरम बाबा यात्रा महोत्सवात विदर्भातील सर्वप्रथम हिंद केसरी मैदानावर आमदार हिंद केसरी जंगी शंकर पटाचे तीन दिवसीय आयोजन करण्यात आले होते. अचलपूरचे आमदार प्रविण तायडे यांच्या नेतृत्वात आयोजित या जंगी



शंकरपटाचा शुभारंभ 8 जानेवारी रोजी करण्यात आला होता. यावेळी माजी खासदार नवनीत राणा, आमदार प्रविण तायडे, प्रमुख अतिथी आमदार केवलराम काळे, उपविभागीय अधिकारी बळवंतराव अरखराव, तहसीलदार डॉ.संजय गरकल, शिरजगांव ठाणेदार महेंद्र गवई, प्रमोद कोरडे, अतुल वाठ, आनंद अहीर, विशाल काकड, कुंदन यादव, अभय माथने, रुपेश ढेपे, सुखदेव पवार, प्रविण तोंडगांवकर, बाळासाहेब सोनार, रितेश नवले, राज पाटील, अभिजीत तायडे, प्रमोद दिवटे, स्वप्नील तायडे, कार्तीक विधाते, धिरज चुनळे, शरद पळसपगार, विक्की किटुकले, मुकुंदराव मालधुरे, रमेश तायवाडे, राजेश डवरे, आदि भाजपा पदाधिकारी या भागातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 250 बैलजोड्या सहभागी

जंगी शंकर पटात जवळपास 250 मालकांनी आपल्या बैलजोड्या या स्पर्धेत सहभागी करण्याकरीता दाखल झाले. तीन गटात आयोजित या पटातील विजेत्यांना 11 लाखांचे बक्षीसे वितरीत करण्यात आले. बुलढाणा एक्सप्रेस बाब्याडॉन, बधीरा देवाभाईचा सहभाग या पटात महत्वपूर्ण मानल्या जात आहे.

### आमदारांनी स्वत: हाकला पट

पटाच्या पहिल्याच दिवशी आमदार प्रविण तायडे यांनी स्वत: धुरकरी होऊन जोडी हाकली. यावेळी उपस्थितांनी जोरदार दाद दिली. यावेळी घड्याळवाले गणेशभाऊ पळशिकर, चरण खरासे सुध्दा दाखल झाले आहे. सर्व शंकर पटातील स्पर्धकांसाठी विशेष व्यवस्था भाजपा पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली. शंकरपटाचा समारोप 10 जानेवारी रोजी पार पडला. यावेळी विजयी बैल जोड्यांवर बक्षीसांची उधळण करण्यात आली.